सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापने-
वरील "कार्यासन-१९अ" मधील विषयानुसार
सादरीकरणाचे तीन स्तर व अंतिम निर्णयार्थ
सक्षम प्राधिकारी निश्चित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांकः संकीर्ण-३५१९/प्र.क्र.७१/१९अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: २२ मे २०१९

वाचा : (१) कार्यालयीन आदेश, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-१०१४/प्र.क्र.१३६/१९अ, दिनांक १६ जुलै २०१४
(२) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.साप्रआ-१०१९/प्र.क्र.३३३/१९, दिनांक ४ मे २०१९

कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम-९(२) नुसार प्रत्येक कार्यालयाचा किंवा विभागाचा प्रमुख त्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्या सादर करण्यासाठी शक्यतो अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करील अशी तरतूद आहे. अशा प्रकारे निर्धारित केलेल्या अधिकाऱ्यांचे स्तर कलम-९(३) नुसार प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिल रोजी अद्ययावत करण्याची तरतूद आहे.

२. कार्यासन-१९ अ मधील प्रकरणांच्या सादरीकरणाचे स्तर हे संदर्भाधीन-१, दिनांक १६ जुलै २०१४ च्या कार्यालयीन आदेशान्वये निश्चित करण्यात आले आहेत. त्यानंतर कार्यासन-१९ च्या विषयसूचीत वेळोवेळी झालेले फेरबदल / नव्याने समाविष्ट झालेले विषय तसेच अधिनियमाच्या कलम-९(३) मधील तरतुदी विचारात घेऊन, कार्यासन-१९अ मधील प्रकरणे सादर करण्याचे स्तर सोबतच्या "जोडपत्र-अ" नुसार अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांनी निश्चित केले आहेत. त्यानुसार कार्यासन-१९ मधील कामकाजाचा निपटारा करण्यात यावा. तथापि, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निर्देश असल्यास किंवा

काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास, प्रकरणपरत्वे त्यात योग्य तो बदल करण्यात येईल.

३. सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२२१५०९०३९४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=c8b1e52c5c4f922ab6eb7a0b44101c838aea34f29fbff0aebe9d85c3de3468c2, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2019.05.22 15:12:32 +05'30'

(वि.रा.ठाकूर)
शासनाचे उप सचिव.

प्रति,

१) सह/उपसचिव (आस्थापना), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संबंधित अवर सचिव / कक्ष अधिकारी / सहायक कक्ष अधिकारी (कार्यासन-१९अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

१) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सर्व कार्यासने, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) कक्ष अधिकारी (कार्यासन-१९), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) निवड नस्ती / कार्यासन-१९अ.

जोडपत्र-अ

(कार्यालयीन आदेश, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-संकीर्ण-३५१९/प्र.क्र.७१/१९अ, दिनांक २२ मे २०१९ चे सहपत्र)

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम-९(२) अंतर्गत संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने, सामान्य प्रशासन विभागातील "कार्यासन-१९अ" मधील विषयांच्या अनुषंगाने प्रकरणे सादर करण्यासाठी अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करणे.

अ.क्र.	विषय	अधिकाराचे प्रत्यायोजन	स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम अधिकारी	आदेश / प्रमाणपत्र / पत्र निर्गमित करण्यास सक्षम प्राधिकारी	अभिप्राय
			प्रथम	व्दितीय	तृतीय			
१	२	३	४	५	६	७	८	९
१	सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवर नवीन पदे निर्माण करणे.	--	कार्यासन अधिकारी / अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सेवा)	मा.मुख्यमंत्री	सहसचिव / उपसचिव	--
२	सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मधील पदांचा आकृतीबंधास मान्यता घेणे.	--	कार्यासन अधिकारी / अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सेवा)	मा.मुख्यमंत्री	सहसचिव / उपसचिव	--
३	सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मधील वित्तीय प्राधिकार प्रदानाचे प्रस्ताव तपासून मंजुरी देणे.	--	कार्यासन अधिकारी	अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	सहसचिव / उपसचिव	कार्यासन अधिकारी	--
४	सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मधील अस्थायी पदांना मुदतवाढ देणे.	--	कार्यासन अधिकारी	अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	सहसचिव / उपसचिव	कार्यासन अधिकारी	--
५	सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मधील अस्थायी पदांचे स्थायीकरण करणे.	--	कार्यासन अधिकारी	अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	सहसचिव / उपसचिव	कार्यासन अधिकारी	--
६	<u>अग्रिम मंजूर करणे :</u> भविष्य निर्वाह निधीमधून परतावा / ना-परतावा अग्रिम (सामान्य बाब)	--	सहायक कक्ष अधिकारी	कार्यासन अधिकारी	अवर सचिव	अवर सचिव	कार्यासन अधिकारी	--
७	<u>अग्रिम मंजूर करणे :</u> भविष्य निर्वाह निधीमधून ना-परतावा अग्रिम (विशेष बाब)	--	कार्यासन अधिकारी	अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	सहसचिव / उपसचिव	कार्यासन अधिकारी	--

१	२	३	४	५	६	७	८	९
८	भविष्य निर्वाह निधीचे अंतिम प्रदान करणे, ठेव संलग्न विमा योजनेंतर्गत रक्कम मंजूर करणे.	--	कार्यासन अधिकारी	अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	सहसचिव / उपसचिव	कार्यासन अधिकारी	--
९	<u>अग्रिम मंजूर करणे :</u> घरबांधणी अग्रिम, सायकल / स्कूटर / मोटार सायकल / मोटार अग्रिम, वैयक्तिक संगणक अग्रिम इत्यादी.	--	कार्यासन अधिकारी	अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	सहसचिव / उपसचिव	कार्यासन अधिकारी	--
१०	सामान्य प्रशासन विभागांतर्गत रचना व कार्यपद्धती संबंधी उद्भवणारी प्रकरणे / संदर्भ याबाबत निर्णय देणे	--	कार्यासन अधिकारी	अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	सहसचिव / उपसचिव	--	--
११	सामान्य प्रशासन विभागांतर्गत सेवा / आस्थापना विषयक बाबींचे समन्वय (उदा.रिक्त पदांची माहिती देणे, अपंग आरक्षण अहवाल / अपंगांना उपकरणे पुरविणे, जात प्रवर्गनिहाय अनुशेषाची माहिती देणे इत्यादी)	--	कार्यासन अधिकारी	अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	सहसचिव / उपसचिव	कार्यासन अधिकारी	--
१२	माहिती अधिकाराचे मासिक व वार्षिक अहवाल पाठविणे, मुख्य सचिव व राज्यपालांना पाठवावयाचे अहवाल व इतर संकीर्ण माहिती संबंधित विभागांना देणे इत्यादी.	--	कार्यासन अधिकारी	अवर सचिव	सहसचिव / उपसचिव	सहसचिव / उपसचिव	कार्यासन अधिकारी	--